
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय अठरावा , भाग पहिला

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय अठरावा : भाग पहिला

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)


२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com



ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख



©श्री विजय पांढरे(२०१२)


**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**


प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

|| ॐ परमात्मने नमः ||

अध्याय अठरावा

# मोक्षसंन्यासयोग

देवा तुमचा जयजयकार । संपली जन्ममरण येरझार । जाणता अनंत अपार । कल्याण झाले ||१||
देवा तू शक्तिमान । अज्ञान ते दूर करून । मोक्षाचेही देतसे दान । भगवंता तू ||२||
देवा तू स्वयं ज्ञान । विरक्त होता ते मन । घडे काळासही जिंकणं । कृपा तुझी ||३||
चित्तात चंचलता प्रकटवून । करणे सृष्टीचे निर्माण । देवा तूच कार्यकारण । अवघाचि की ||४||
करून दोषांचे निराकरण । प्रकटवितोस तू ज्ञान । विश्वाचे ते संचालन । तुझेचि ठायी ||५||
देवा तू जगदीश । स्वसंवेद्य स्वयंप्रकाश । अनंत व्यापक जैसे आकाश । तैसे भगवंता ||६||
संपवून अज्ञानाचा अंधार । करतोस जीवाचा तू उद्धार । अपार दयेचा सागर । भगवंता तू ||७||
कामनारुपी सर्प मारून । अंतरी ज्ञानदीप उजळून । शांतीचे ते प्रकटन । करतोस तू ||८||
मन विरक्त होता । प्रकटते तुझ्याशी एकरूपता । मनइंद्रियात अडकता । अगम्य तू ||९||
देवा तू कल्पनातीत । मोक्षाचे फळ अद्‌भुत । मनइंद्रियांच्या अतीत । वास तुझा ||१०||
विचार शब्द आणि मन । यांना नाही तुझे ज्ञान । ज्याकारणे घडे जाणणं । ती जाणीव तू ||११||
करू जाता तुझे वर्णन । शब्दी न तू सापडणं । पाहता शब्दांचे अपुरेपण । लज्जित मी ||१२||
जोवरी चंद्र न उगवणे । तोवरीच सागर शांत राहणे । घडता चंद्राचे उगवणे । उचंबळे तो ||१३||
सोमकांत मणी पाझरणं । तो नाही मण्याचा गुण । चंद्राच्या त्या शक्तिकारण । पाझरे तो ||१४||
होता वसंताचे आगमन । सर्वत्र पालवी फुटणं । निसर्गाची ती उधळण । वसंताकारणे ||१५||
सूर्यकिरणांच्या त्या स्पर्शानं । कमलिनीस न उरे देहभान । जसे मीठ जाई जिरून । स्पर्शता पाणी ||१६||
देवा होता तुझे स्मरण । मी जाई मी मजला विसरून । जसे तृप्तीचे प्रकटन । भोजनाकारणे ||१७||
आकळता तुझे ज्ञान । गेले संपून माझे मीपण । आता तुझी स्मृती करणं । कर्तव्य माझे ||१८||
जीवभाव तो राखून । तुझे वर्णन ते करणं । मग द्वैताचं प्रकटन । अनिवार्य की ||१९||
तुज अद्वैताच्या ठिकाणी । वर्णणे गुणांची कहाणी । ती भेदाचीच करणी । आहे भगवंता ||२०||
तुला मायबाप म्हणणे । तेही द्वैताचेच गाणे । द्वैती तुझे आकळणे । अशक्यच की ||२१||
देता तुला गुरुपण । मजठायी शिष्यत्व येणं । मग द्वैताचे ते न्यून । जाईल कैसे ||२२||
तुला जर आत्मा म्हणणे । मग जग काय असणे । तुला शब्दाने वर्णणे । द्वैतच की ||२३||
तुझी स्तुती ती करणं । ते देवा अज्ञान । केवळ साक्षी मौन । स्वरूप तुझे ||२४||
स्तुती म्हणजे मौन । पूजा म्हणजे काही न करणं । शून्य होऊन जाणं । दर्शन तुझे ||२५||
जसा तो भ्रमित । आपणच आपला असे बडबडत । तैसे माझे मनोगत । उपहासावे तुम्ही ||२६||
आशीर्वाद मज देऊन । प्रकटवा गीतार्थ गहन । करावे श्रोत्यांचे मन । प्रसन्न देवा ||२७||
बोल ते ऐकून । म्हणाले निवृत्ती भगवान । परीसा वारंवार विनंती करणं । लगे का कधी ||२८||
तेव्हा ज्ञानदेव म्हणाला । या आपुलीया बोला । प्रसाद मजसी पावला । देवा आता ||२९||
गीतेचा जो कळस । ऐसा अठरावा अध्याय खास । गहन त्या अध्यात्म रहस्यास । ऐकावे आता ||३०||



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

होता दुरून कळस दर्शन । मन होते बा प्रसन्न । जसं देवाचंच भेटणं । घडलं अर्जुना ॥३१॥
तैसेच येथेही आहे । जे एकेचि येणे अध्याये । आघवाचि प्रकट होये । गीतार्थ पूर्ण ॥३२॥
हेच आहे ते कारण । मी यास कळस म्हणेन । गहन अध्यात्म ज्ञान । प्रकटले येथे ॥३३॥
मंदिर कळसाच्या पश्चात । काहीच बांधकाम नाही उरत । गीता होतसे समाप्त । अठराव्या अंती ॥३४॥
व्यास मोठे बुद्धिमान । त्यांनी उपनिषद पठार खणून । गहन ते अध्यात्मज्ञान । सांगितले येथे ॥३५॥
ऐशा या खणतीतला । दगड चुरा जो निघाला । मग मंदिरा सभोवती बांधला । कोट त्याचा ॥३६॥
प्रकटविण्या आत्मज्ञान । संपूर्ण झाडली जमीन । मग अर्जुना निमित्त करून । सांगितली गीता ॥३७॥
मनोनिवृत्तीचा प्रकार । जे सर्व शास्त्रांचे सार । ते सांगितले सविस्तर । गीते माजी ॥३८॥
ऐसे पंधरा अध्याय सांगून । केले पंधरा मजले पूर्ण । रचना मंदिराची संपूर्ण । जाहली तेथे ॥३९॥
सोळाव्या त्या अध्यायात । आहे मंदिराचा घुमट । बैठक कळसाची सतराव्यात । रचली आहे ॥४०॥
नंतर त्या अठराव्यात । कळसाची रचना करत । धर्मध्वज असती फडकवत । व्यास तेथे ॥४१॥
मजल्यावर मजले चढवून । व्यासांनी सांगितलं ज्ञान । तेथे अठरावा महत्त्वपूर्ण । असे अंती ॥४२॥
सर्व अध्यायांचे सार । जसा कळसाचा प्रकार । तैसे महत्त्व अपार । अठराव्याचे आहे ॥४३॥
अध्यात्मज्ञान गहन । अठराव्यात ते सांगून । सर्व जीवांचे कल्याण । व्यासांनी केले ॥४४॥
जप ते करणं । ते आहे प्रदक्षिणा घालणं । मंदिराच्या सावलीत बसणं । श्रवण आहे ॥४५॥
दुसऱ्यांनी धरून अवधान । गाभाऱ्यात प्रवेश ते करणं । तेव्हाच अंतरी आत्मज्ञान । अनुभवा येते ॥४६॥
ऐसे होणे आत्मज्ञान । तेच भेटणे भगवान । होते मोक्षाचे प्रकटन । ज्ञान होता ॥४७॥
जसे श्रीमंत पंक्ती भोजनात । सर्वांनाच सारखे पदार्थ मिळतात । तैसे या गीताश्रवणात । ज्ञान सर्वा ॥४८॥
अठराव्याचे महत्त्व जाणून । मंदिराचा कळस म्हणून । करतो तयाचे मी वर्णन । निःशंकपणे ॥४९॥
आता सतराव्या नंतरी । आली अठराव्याची बारी । अध्यात्मज्ञान नंबरी । अनुभवाल येथे ॥५०॥
जसे गंगा-यमुनेचे पाणी । एकरूप ते असुनी । वेगळेपणाची भासणी । द्वैताकारणे ॥५१॥
न मोडता दोन्ही आकार । घडले एक शरीर । ते अर्धनारीनटेश्वर । जैसे अर्जुना ॥५२॥
जैसे कला कमी जास्ती । चंद्रबिंबी त्या आढळती । पण चंद्राची ती स्थिती । अखंडच की ॥५३॥
चार त्या चरणांकारण । ओव्या वेगळ्या भासणं । पण एकाच विषयाचं प्रतिपादन । सर्वत्र आहे ॥५४॥
दोऱ्यात मणी ओवून । जैसा हार एक गुंफणं । तैसे अठरा अध्यायांचं असणं । आहे येथे ॥५५॥
पुष्कळ मोती जोडून । दागिना एक घडवणं । तैसे गीतेचे प्रकटन । जाहले आहे ॥५६॥
शक्य फुले ती मोजणं । पण सुवासा कैसे मापन । तैसे सर्वत्र अध्यात्मज्ञान । एकचि आहे ॥५७॥
सर्व सातशे श्लोक । तेच अठरा अध्यायांचे लेख । सर्वत्र देवो बोलले एक । दुजे नाही ॥५८॥
तैसीच वाट धरून । मी केले आहे निरूपण । परि सर्वत्र ते ज्ञान । एकचि आहे ॥५९॥
सतराव्या अध्यायात । म्हणाले होते भगवंत । तेच ज्ञान सांप्रत । ऐकावे पुढे ॥६०॥
अर्जुना ब्रह्म न जाणता । जर आचरली केवळ कर्मठता । मग अंतरीची अशुद्धता । जाईच ना ॥६१॥
ऐकून कृष्णाचे वचन । विचार केला अर्जुनानं । देवाने कर्मठांना दूषण । लावले दिसते ॥६२॥
जीव त्या अज्ञानाकारण । न जाणे ब्रह्मज्ञान । केवळ का ॐ तत्सत् शब्दानं । ज्ञान होते ॥६३॥
रज तमाच्या कारण । जीव असे श्रद्धाहीन । मग तया ब्रह्मज्ञान । व्हावे कैसे ॥६४॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

हत्यारा आलिंगन देणे । दोरीवर ते धावणे । जशी नागीण खेळवणे । प्राणघातक ॥६५॥
तैसे त्या कर्माच्याकारण । घडे येथे जन्ममरण । अज्ञानात योग्य कर्म घडणं । कठीणच की ॥६६॥
निष्काम कर्म घडता । प्रकटते ती ब्रह्ममयता । अन्यथा ती ब्रह्ममयता । प्रकटेच ना ॥६७॥
ऐसे कर्म करण्यात । धोके खूप असतात । मग राहणे अज्ञानात । अनिवार्य की ॥६८॥
कर्माची समज येऊन । कर्माचा त्याग घडणं । मन निष्काम होणं । संन्यास आहे ॥६९॥
कर्माची व्यर्थता समजते । तेव्हाच कर्म विरते । मगच अंतरी प्रकटते । ब्रह्मज्ञान ॥७०॥
जयांच्या त्या कारण । होते ज्ञानाचे प्रकटन । ते संन्यास त्याग दोन । सूत्र असती ॥७१॥
ऐशा गोष्टी त्या दोन । होण्या स्पष्ट अजून । होते प्रश्न विचारले अर्जुनानं । भगवंता तेव्हा ॥७२॥
तयांचेच स्पष्टीकरण । झाले अठराव्या अध्यायातून । संपूर्ण ते ज्ञान । प्रकटले येथे ॥७३॥
अर्जुनाने विचारले म्हणून । भगवंताने सांगितले ज्ञान । ऐसे अठरा अध्यायांचे प्रकटन । गीते माजी ॥७४॥
अठरा अध्यायांचं होणं । ते असे कार्यकारण । पुढचा मागल्याकारण । निर्माण झाला ॥७५॥
ऐसे सर्व अर्जुनाने । ऐकले देवाचे बोलणे । अस्तित्वाचे होणे जाणे । समजले त्याला ॥७६॥
त्या उपदेशाच्या कारणे । अर्जुन संतोषला ज्ञानाने । परि संवाद तो थांबणे । न साहे तया ॥७७॥
दूध झाल्यावरही पिऊन । दूर जाऊच नये वासरानं । ऐसे जे चिंतणे गायीनं । तैसेच पहा ॥७८॥
कोणत्याही कारणावीण । बोलत रहावं भगवंतानं । ऐसेच अर्जुना वाटणं । स्वाभाविक की ॥७९॥
ऐशा प्रेमाकारण । क्लेश अर्जुना वाटून । तोडण्या ते मौन । सरसावला तो ॥८०॥
आरशात रुप पाहून । जैसे आपणच खूश होणं । तैसेच ते विचारणं । होतं त्याचं ॥८१॥
थांबल्याने ते संभाषण । सुखही थांबून जाणं । ते अर्जुना सहन । झाले नाही ॥८२॥
त्याग संन्यासाचे निमित्त करून । वाढवण्या ते संभाषण । अठराव्यात पुन्हा प्रश्न । विचारला त्याने ॥८३॥
अठराव्याची ही कथा । जी आहे एकाध्यायी गीता । वासरू गायीस पिऊ लागता । फुटतो पान्हा ॥८४॥
ऐकून अर्जुनाचा प्रश्न । संवाद सुरू केला भगवंतानं । धनी नाही का देत मान । सेवका जैसा ॥८५॥
परि असो हे ऐसे । अर्जुन जे पुसत असे । ते तुम्हा मी सांगतसे । ऐकावे आता ॥८६॥

- अर्जुन उवाच -

संन्यास व त्याग शब्दातून । अर्थ एकच होतो निष्पन्न । दोन्ही नसतीच ते भिन्न । मजसाठी भगवंता ॥८७॥
त्याग आणि संन्यासात । त्यागच असे वसत । ऐसेच मज वाटतं । भगवंता माझ्या ॥८८॥
या दोन्ही शब्दात । जर असेल वेगळा अर्थ । तर देवा तो स्पष्ट करत । सांगावा मजला ॥८९॥

- श्री भगवानुवाच -

त्याग व संन्यासाला । अर्जुना तू एकचि समजला । यात शंका ती मजला । नाही काही ॥९०॥
दोन्ही त्या शब्दातून । होते त्यागाचेच प्रकटन । पण अर्थ जरा भिन्न । आहे त्यांचा ॥९१॥
कर्माचे संपूर्ण संपणे । तया मी संन्यास म्हणे । आणि केवळ फल न इच्छिणे । त्याग आहे ॥९२॥
कैसे कर्म ते वाढते । आणि कैसे ते संपते । हे सांगतो स्पष्ट ते । ऐक आता ॥९३॥
जसे त्या जंगलात । झाडे आपोआप वाढतात । पण करावी लागते मशागत । साळीभाता ॥९४॥
गवताचं ते वाढणं । अर्जुना त्या पेरणीवाचून । पण जमीन भाजल्यावीण । साळ नाही ॥९५॥
आपोआप शरीर होते निर्माण । पण दागिना पडे घडवणं । विहीर पडे ती खणणं । नदी आयतीच ॥९६॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तैसे नित्य नैमित्तिक । कर्म होय स्वाभाविक । फलाशा सांडता सकळीक । न बांधते ते ॥९७॥
फलाशेच्या त्याकारणे । घडते कर्माचे वाढणे । मग अश्वमेध यज्ञ करणे । घडे तेथे ॥९८॥
अर्थधर्म काम । विहिरी बगीचे महाग्राम । ऐसी नाना कर्म । घडती तेथे ॥९९॥
कर्मांच्या त्या कारणे । कामनांचे सिद्धीस जाणे । मग जीव फलेच्छेकारणे । बंधनी पडे ॥१००॥
जैसे देह तो धरता । जन्ममरण न येते चुकविता । जन्ममरणाची ती कथा । देहा कारणे ॥१०१॥
जसे ललाटीचे लिहिले । ते का कोणा पुसता आले । काळेगोरेपण धुतले । न जाते जसे ॥१०२॥
कर्माच्या त्या कारण । घडे फळ ते भोगणं । जसे कर्ज फेडल्यावीण । सुटका नाही ॥१०३॥
मनात काही नसणे । पण फळ पडे भोगणे । जसे उगाच जाता रणे । लागे बाण ॥१०४॥
जसे जरी नकळत । गूळ जर घातला तोंडात । तरी गोडच असे लागत । तैसे अर्जुना ॥१०५॥
असता कर्माचं रहाटणं । तेथे आहेच मग बंधन । ऐशा कर्मी सावध राहणं । सूत्र आहे ॥१०६॥
किंबहुना पार्था ऐसे । जे काम्यकर्म गा असे । ते त्यजिजे विष जैसे । ओकुनिया ॥१०७॥
ऐसे कर्म मुळातून त्यागणं । तया संन्यास म्हणती ज्ञानीजन । ऐसे तो भगवान । बोलला तेथे ॥१०८॥
द्रव्य ते त्यागणे । मग कैसे भयाचे उरणे । तैसे कामनांचे सांडणे । संपविते कर्म ॥१०९॥
त्या चंद्रसूर्य ग्रहणात । जी कर्मे करावी लागतात । वा मातापित्यांचे मरणात । श्राद्ध जैसे ॥११०॥
पाहुणा घरासी येता । घडते सत्काराची कथा । नैमित्तिक कर्मांची आवश्यकता । तैसी अर्जुना ॥१११॥
आकाश पावसाळ्यात गडगडणं । वसंतात सुंदर होणे रान । तारुण्यात जसे मोहकपण । शरीरा येते ॥११२॥
जसे चंद्रकिरणाकारण । सोमकांत मणी पाझरणं । तैसेच कर्माचं हे घडणं । आहे अर्जुना ॥११३॥
कर्म नित्यासारखं वाटणं । पण करणे पडे निमित्ताकारण । तयासी नैमित्तिक जाण । अर्जुना तू ॥११४॥
जे करावे लागते प्रतिदिनी । सकाळ सायंकाळ मध्यान्ही । ते कर्म नित्य म्हणूनी । प्रसिद्ध आहे ॥११५॥
जशी स्वाभाविक गती । असते पायात ती । वा असते ती दीप्ती । ज्योतीत अर्जुना ॥११६॥
बाहेरून वास न घालता । चंदनाअंगी जशी सुवासिकता । तैसी जी कर्मठता । ती नित्य अर्जुना ॥११७॥
संपूर्ण पहा अर्जुना । मी वर्णिले त्या दोहोंना । जाणणे नित्य नैमित्तिक कर्मांना । आवश्यक की ॥११८॥
अर्जुना कित्येक जन । दोहोंना वांझ समजून । जाती तयात अडकून । अनायासे पहा ॥११९॥
जसे जेवणाच्या कारणे । समाधान ते होणे । तैसे होते फलाचे लाभणे । दोहोच्या कारण ॥१२०॥
जसे अग्नीच्याकारणे । शुद्ध होते सोने । तैसे दोषांचे संपणे । या दोहो ठायी ॥१२१॥
या दोहोंसी आचरणे । सर्व दोष झडून जाणे । मग सद्‌गती लाभणे । अनिवार्य की ॥१२२॥
ऐसे दोहोंना आचरता । सद्‌गती येते हाता । परि फलासी त्या त्यागता । मोक्ष अर्जुना ॥१२३॥
वसंताच्या त्या कारणे । घडे फळांचे लगडणे । पण फळ ते चाखणे । न ठाऊक वसंता ॥१२४॥
मनी स्थापून अवधाना । घडू द्यावे या कर्मांना । त्यागणे तयांच्या फळांना । सूत्र की ॥१२५॥
ऐशा कर्मफल त्यागाते । त्याग म्हणती ते जाणते । ऐसे त्याग संन्यास तुते । ऐकविले मी ॥१२६॥
संन्यासाचे होता प्रकटन । नच घडते ते कर्मबंधन । संपूर्ण कर्म निरसणं । मोक्ष आहे ॥१२७॥
आणि नित्यादिक जे असे । ते येणे फलत्यागे नासे । शिर लोटल्या जैसे । लोटते शरीर ॥१२८॥
जेधवा कर्माची समज येते । आणि कर्म विरून जाते । मगच आत्मज्ञान होते । नष्ट होता कर्म ॥१२९॥
ऐसे त्याग संन्यास दोन । तयांचे घडता अनुष्ठान । तेथे प्रकटते आत्मज्ञान । आपोआप ॥१३०॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

कर्माची समज न येता । त्याग आणि संन्यासता । दोहों ठिकाणी विफलता । ठेवली आहे ॥१३१॥
रोगाची चिकित्सा न करणे । अज्ञानात औषध योजना करणे । ते विषच की घेणे । अर्जुना माझ्या ॥१३२॥
जे त्याज्य बा असणे । तयाचा त्याग न करणे । आणि तो लोभ न धरणे । त्याज्याचा अर्जुना ॥१३३॥
त्यागाची समज न येता । बळजबरीने त्याग करता । अंतरी मग द्वंद्वता । अखंडचि असे ॥१३४॥
फलाभिलाषा न सुटणं । आणि कर्मा दोष देणं । ते आपण नाचून नग्न । जगा भांडखोर म्हणणं ॥१३५॥
जिभेची चटक न आवरणे । आणि अन्नाला दोष देणे । जसे ते कुष्ठरोग्याचे रागावणे । माशांवर ॥१३६॥
तैसे फळकाम दुर्बळ । म्हणती कर्मचि किडाळ । मग निर्णय देती केवळ । त्यजावे ऐसा ॥१३७॥
एक म्हणती यागादिक । करावेचि आवश्यक । तैसे चित्त शुद्धी शोधक । आन नाही ॥१३८॥
करण्या शुद्ध ते मन । कर्मचि असो बा साधन । कर्मात कर्माचं निरसणं । सूत्र आहे ॥१३९॥
जसे शुद्ध करण्या सोने । पडे आग ती झेलणे । तैसे कर्मात निष्काम राहणे । रहस्य आहे ॥१४०॥
जसे घाण ती धुण्यात । घाणीस लावणे पडे हात । तैसे कर्मी कर्मास निरसत । मुक्त व्हावे ॥१४१॥
जर कर्म त्याज्य मानलं । मग शुद्धता कैसी येईल । जयाचे कर्म निष्काम होईल । तो पावतो मुक्ती ॥१४२॥
कर्म सिद्धांत जाणणे । कर्मी निष्काम होणे । तरच मन शुद्ध होणे । घडते अर्जुना ॥१४३॥
जर कर्मी निष्कामता नसेल । मग सर्व वाया जाईल । भवचक्रातच तो फिरेल । जीव अर्जुना ॥१४४॥
प्रकार त्यागाचे तीन । आता सांगतो मी समजावून । मनी दक्ष ते होऊन । ऐकावे आता ॥१४५॥
त्यागाचे तीन प्रकार । भासती जे वरवर । पण विश्वाचे जे सार । ते जाणावे मनी ॥१४६॥
जर मुक्तीची इच्छा असणे । मग पडे ब्रह्ममय होणे । वरवरच्या उपायाने । मुक्ती नाही ॥१४७॥
सर्वज्ञ मी अर्जुना । म्हणून सांगतो या खुणा । पावणे त्या ब्रह्मज्ञाना । सूत्र आहे ॥१४८॥
जसे प्रवास ते करणे । मग पडेच की चालणे । तैसे यज्ञ तप दाने । करावीत अर्जुना ॥१४९॥
जोवरी वस्तू नाही सापडत । बसावे बा शोधत । कोणी ताट का दूर लोटतं । पोट भरल्याविणा ॥१५०॥
जसे पक्व झाल्यावीण । केळीचे झाड न तोडणं । तैसा शोध न सोडणं । ब्रह्ममयतेचा अर्जुना ॥१५१॥
जोवरी न प्रकटे आत्मज्ञान । न सोडावे अर्जुना साधन । यागादिक ते करणं । तो शोध अर्जुना ॥१५२॥
आपल्या अधिकाराप्रमाणं । करत जावे ते साधन । पण साधनी निष्काम राहणं । सूत्र आहे ॥१५३॥
वेगात जयाचे चालणे । मग लवकर तयाचे पोहोचणे । तैसे कर्मी निष्काम होणे । सार आहे ॥१५४॥
जैसे योग्य औषध घेणे । मगच घडे रोगाचे संपणे । त्वरित कर्मी निष्काम होणे । रहस्य आहे ॥१५५॥
अर्जुना निष्काम ते राहत । सर्व कर्मे जर केलीत । मग रज तम विरतात । आपोआप ते ॥१५६॥
जैसे आगीत ते जाळता । सोन्यासी येते शुद्धता । तैसे निष्काम कर्म करता । प्रकटे शुद्धी ॥१५७॥
ऐसे कर्म ते अंगीकारून । रज तम निरसून । सात्त्विकतेस ते पावणं । कल्याण अर्जुना ॥१५८॥
निष्काम कर्म करता । प्रकटते ती सात्त्विकता । म्हणून तीर्थाची योग्यता । कर्मासी अर्जुना ॥१५९॥
तीर्थाने जातो बाह्य मळ । निष्काम कर्मात सात्त्विकता उजळ । म्हणून कर्मे असती निर्मळ । तीर्थाप्रमाणे ॥१६०॥
जसे एकाद्याला बुडताना पाहून । नदीनेच मदतीला धावणं । तैसे कर्माच्याच आधारानं । प्रकटते मुक्ती ॥१६१॥
जैसे मृत्यूच्याकारण । पुढील जन्माचं प्रकटणं । घडता सर्व कर्मांचं निरसणं । प्रकटते मुक्ती ॥१६२॥
तैसे समज ती येवून । घडो कर्माचं आचरण । कर्मी कर्माचं निरसणं । सूत्र आहे ॥१६३॥
कर्म सिद्धांत तो जाणून । अंतरी निष्काम होणं । मग कर्माचे ते बंधन । विरून जाई ॥१६४॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ज्या कर्माच्या कारण । कर्मी कर्माचं विरणं । त्या कर्माचं रहस्य उलगडून । दावतो तुजला ॥१६५॥
करावे कोणतेही साधन । पण कर्तेपणावीण । तेव्हा ते कर्मबंधन । तुटते अर्जुना ॥१६६॥
स्वत:चा व्यवसाय म्हणून । तीर्थाला ते जाणं । मग तीर्थयात्रेचे समाधान । लाभेच ना ॥१६७॥
राजाच्या आज्ञेकारण । बलाढ्यासही बेडी घालणं ।तो सैनिक स्वत:चे कर्तेपण । न मानी जैसा ॥१६८॥
जो दुसऱ्याचा आधार घेतो । आणि तरून जातो । तया अहंकार नसतो । पोहण्याचा अर्जुना ॥१६९॥
तैसे न धरता अहंकार । कर्मे पाडता ती पार । कर्तेपणाचं ते वारं । लागेच ना ॥१७०॥
आणि जरी कर्माचे कारणे । घडे फळाचे ते प्रकटणे । अर्जुना तया दुर्लक्षणे । कल्याणकारी ॥१७१॥
फळाची आस ती सोडून । होवो कर्माचं ते घडणं । जसं दायीचं सेवा करणं । ममत्वावीण ॥१७२॥
फळाच्या त्या आशेवीण । पिंपळास पाणी घालणं । तैसे होवो कर्माचं घडणं । फल इच्छेवीण ॥१७३॥
दुधाची अपेक्षा न ठेवतो । गायी वळणारा गुराखी तो । तैसा व्यवहार कल्याण करतो । जिवाचा अर्जुना ॥१७४॥
ऐसा कर्मसिद्धांत उमजून । निष्काम कर्माचं घडणं । तयासीच ते आत्मज्ञान । प्राप्त होते ॥१७५॥
म्हणून फल इच्छा टाकून । सांडून ते कर्तेपण । कर्मे करावीत माणसानं । निरोप माझा ॥१७६॥
जो जीव कर्मात शिणला । आतुर जर तो मुक्तीला । मग माझ्या या उपदेशाला । आचरावे त्याने ॥१७७॥
अंधारावर त्या रागवून । आपलेच डोळे फोडणं । तैसे द्वेषाकारण कर्म त्यागणं । चूक अर्जुना ॥१७८॥
तैसे जे कर्म त्यागणे । तामस मी तया म्हणे । जसे शिरच तोडून टाकणे । अर्धशिशी कारण ॥१७९॥
मार्ग आहे कठीण । म्हणून पाय का टाकावे तोडून । त्या पायाच्याच तर कारण । चालणे घडे ॥१८०॥
भुकेल्या मिळावे अन्न । ते तयाने फेकून देणं । तैसे ते कर्म त्यागणं । आहे अर्जुना ॥१८१॥
जैसे कर्मीच संपते कर्म । हेच आत्मज्ञानाचे वर्म । जाणणे हा कर्माचा धर्म । सूत्र आहे ॥१८२॥
ऐसी समज न येणे । कर्म द्वेषाने त्यागणे । त्या त्यागा मी म्हणे । तामसी अर्जुना ॥१८३॥
कर्माची समज असते । विहित कर्मही कळते । पण निष्कामता न आवडते । राजसा अर्जुना ॥१८४॥
निष्काम कर्म करणे । तया कष्टप्रद वाटणे । जसे फक्त शिदोरी वाहणे । कष्टदायी ॥१८५॥
निंब लागतो कडवट । आणि हिरडा तो तुरट । तैसे राजसा वाटती कष्ट । निष्कामतेचे ॥१८६॥
दुधाळ गाय मारते । रांधणे कष्टप्रद असते । तैसे तया निष्काम कर्म ते । कष्टदायी अर्जुना ॥१८७॥
तया आरंभीच्या कष्टाकारण । निष्कामता न आवडणं । म्हणून कर्मच न आरंभणं । तयाने अर्जुना ॥१८८॥
विहित कर्म म्हणून । जर निष्काम कर्म आरंभणं । पण मधेच देतसे टाकून । कंटाळल्याकारण ॥१८९॥
म्हणे देहासारखी मौल्यवान । वस्तु मिळाली दैवानं । तिचा भोग न घेणं । अयोग्य की ॥१९०॥
निष्काम कर्म जर करील । तर भविष्यात फळ मिळेल । पण आज सुख हातातील । सोडू कशाला ॥१९१॥
ऐसे देहकष्टाला भिणे । आणि कर्मत्याग तो करणे । तया राजसी मी म्हणे । अर्जुना माझ्या ॥१९२॥
तेथे घडते कर्माचं त्यागणं । पण ते फलप्राप्तीवीण । जसे दूध ते उतू जाणं । हवन नाही ॥१९३॥
जसे पाण्यात त्या बुडून । गेला अर्जुना प्राण । तया जलसमाधी म्हणणं । योग्य नाही ॥१९४॥
तैसे देहकष्टाला भिऊन । कर्माचं जे त्यागणं । तया मोक्ष तो मिळणं । शक्य नाही ॥१९५॥
सूर्य तो उगवता । विरतो नक्षत्रांचा राबता । तैसी संपते सकामता । प्रकटता ज्ञान ॥१९६॥
कर्मसिद्धांत उमजणे । सकाम क्रिया संपणे । अर्जुना त्याच बा त्यागाने । प्रकटतो मोक्ष ॥१९७॥
अज्ञानात कर्म टाकणे । तया मी त्याग न म्हणे । मोक्षाचे ते प्रकटणे । नाही तेथे ॥१९८॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

कोणत्या त्या त्यागाने । घडे मोक्षफळाचे प्रकटणे । सांगतो ते विस्ताराने । ऐक आता ॥१९९॥
पूर्वजन्मीच्या संस्काराकारणे । जैसे स्वभाव आपुला असणे । तैसेच आपण आचरणे । कल्याणकारी ॥२००॥
मी कर्ता वा असणे । हा भाव मनातून टाकणे । आणि फलाशा ती सोडणे । कल्याण अर्जुना ॥२०१॥
जैसे अवज्ञा आणि कामना । मातेच्या ठायी अर्जुना । केल्यास दोन्ही पतना । हेतू होती ॥२०२॥
तैसेच कर्माचे असणे । निषिद्ध त्यागणे आणि भोगणे । कर्म निष्कामपणे करणे । सूत्र आहे ॥२०३॥
आपल्या आवडत्या फळात । बिया आणि साली असतात । म्हणून फळ नाही फेकत । कोणी अर्जुना ॥२०४॥
कर्तृत्वाचा मद असणं । आणि कर्मफळाचा आस्वाद घेणं । अर्जुना दोहोंच्याच कारण । बंधन की ॥२०५॥
अर्जुना जसा बापलेकीत । कर्म व्यवहार असतो घडत । तैसे जो कर्म असे करत । तया दु:ख नाही ॥२०६॥
ऐशाच नि:ष्काम त्यागाकारणे । फळ मोक्षाचे प्रकटणे । तया सात्त्विक त्याग म्हणे । अर्जुना मी ॥२०७॥
टाकता बीज जाळून । वृक्षाचा वंश खुंटणं । तैसे फळ त्यागाकारण । खुंटते कर्म ॥२०८॥
जसे परीसाच्या स्पर्शानं । लोहाचं होत असे सोनं । तैसे तुटते रजतम बंधन । सत्त्वाकारणे ॥२०९॥
त्या सात्विकतेच्या कारण । प्रकटते अर्जुना आत्मज्ञान । मग विश्वाभास जातो संपून । ज्ञान होता ॥२१०॥
ऐसे अज्ञान ते संपते । आणि ज्ञान अंतरी प्रकटते । मग ब्रह्मच ते उरते । सर्वत्र अर्जुना ॥२११॥
जसे अर्जुना आकाशात । ढग ते विरून जातात । तैसे संपते संचित । आपोआप ॥२१२॥
संचिताच्या त्या कारण । घडे सुखदु:खाचं प्रकटन । पण विचलित ते होणं । न ठाऊक तया ॥२१३॥
कर्म शुभ म्हणून । करावे ते आनंदानं । वा अशुभा वर्ज्य मानणं । न घडे तेथे ॥२१४॥
जसे स्वप्नातून जागता । संपते ती भ्रमता । तैसे इष्ट अनिष्टता । नाही तेथे ॥२१५॥
जेथे कर्म आणि कर्ता । वेगळे नसती पार्था । ऐशा त्यागाची ती वार्ता । सात्त्विक गा ॥२१६॥
ऐशा प्रकारे पार्था । जर कर्मफल न त्यागले सर्वथा । मग बळकटे ती बंधनता । अधिकच की ॥२१७॥
जयानी स्वत: कर्म बनून । देह तो धारण करणं । तयांनी कर्म ते त्यागणं । चूकच की ॥२१८॥
कधी का त्या घटानं । मातीचा कंटाळा करणं । वस्त्राने तंतूला त्यागणं । शक्य का कधी ॥२१९॥
कधी का त्या अग्नीनं । उष्णतेचा कंटाळा करणं । प्रकाशाचा द्वेष दिपानं । केला का कधी ॥२२०॥
वासाचा अर्जुना हिंगाला । कधी का त्रास झाला । पाण्याने सोडणे द्रवपणाला । घडले का कधी ॥२२१॥
तैसे शरीराच्या आधाराने । जोपर्यंत अर्जुना जिवंत असणे । तोपर्यंत कर्म ते त्यागणे । शक्य नाही ॥२२२॥
कपाळी लावलेला टिळा । येई नीट करता वेळोवेळा । पण वाकड्या त्या कपाळा । उपाय नाही ॥२२३॥
विहित कर्म स्वीकारलेलं । ते अर्जुना टाकता येईल । पण कर्मच जे देह झालं । ते त्यागावे कैसे ॥२२४॥
जसं अर्जुना श्वसन । झोपेतही ते चालणं । तैसे कर्म ते घडणं । देहासोबती ॥२२५॥
ऐसे शरीराच्या रुपानं । कर्माचंच प्रकट होणं । मेल्यावरही जिवंतच असणं । कर्म अर्जुना ॥२२६॥
हे कर्म त्यागण्यास । अर्जुना एकच युक्ती खास । त्यागणे फळाच्या आशेस । उपाय की ॥२२७॥
तैसे ईश्वरा कर्मफळ अर्पिता । आत्मबोध वा जागता । रज्जूचे ज्ञान होता । लोपतो सर्प ॥२२८॥
तैसे आत्मबोधाच्या कारण । अविद्या कर्मासह संपणं । तेच अर्जुना त्याग म्हणून । प्रसिद्ध आहे ॥२२९॥
ऐसे कर्म ते करून । कर्मातून मुक्त होणं । तयासीच त्याग म्हणणं । मान्य मजला ॥२३०॥
मूर्च्छेच्या त्या कारण । कर्म व्यवहार थांबणं । ते अवघेचि अज्ञान । आहे अर्जुना ॥२३१॥
कर्मी निष्काम राहता । समूळ संपते कर्मकथा । समूळ संपणे कर्माची कथा । ज्ञान अर्जुना ॥२३२॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

कर्माच्या त्या कारण । त्रिविध फल प्रकटन । इच्छा धरून कर्म करणं । बंध आहे ॥२३३॥
इदं न मम उच्चारून । पिता जातसे सुटून । पण पडे पहा अडकून । जावई तेथे ॥२३४॥
अफू आणि भांग पिकवून । पिकवणाऱ्याने अलिप्त राहणं । पण सेवणाऱ्याचा जातसे प्राण । तैसे अर्जुना ॥२३५॥
फलाशा ती टाकून । अर्जुना कर्म करणं । मग तेथे कैसे बंधन । प्रकटेल अर्जुना ॥२३६॥
गोष्ट रस्त्यावरील वृक्षाची । न धरीली जर अपेक्षा फळाची । मग शक्यता फळप्राप्तीची । नाहीच जैसी ॥२३७॥
अर्जुना कर्म ते करून । अंतरी निष्काम राहणं । मग कर्मफळाचं बंधन । प्रकटेच ना ॥२३८॥
देव मनुष्य स्थावर । यासी नाव जगडंबर । अर्जुना हे तिन्ही प्रकार । कर्मफळाचे ॥२३९॥
एक गा अनिष्ट । एक ते केवळ इष्ट । आणि एक इष्टानिष्ट । त्रिविध जैसे ॥२४०॥
विषयांच्या नादी लागून । पाप अर्जुना करणं । मग अनिष्ट फळ भेटणं । अनिवार्य की ॥२४१॥
कुकर्म ते करणं । मग कीडे मुंगी होणं । अर्जुना हेच अनिष्ट म्हणून । प्रसिद्ध आहे ॥२४२॥
स्वधर्म अनुसरून । अर्जुना जे करती पुण्य । तया स्वर्ग तो लाभणं । अनिवार्य की ॥२४३॥
स्वर्गी प्रवेश होणं । देवांचा देह लाभणं । तेच इष्ट फळ प्रकटन । आहे अर्जुना ॥२४४॥
गोड आणि आंबट । होता दोहोंची एकवट । चव ती भन्नाट । प्रकटते अर्जुना ॥२४५॥
रेचक कुंभक करून । अर्जुना योग तो साधणं । तैसे सत्य असत्य मिसळणं । इष्टानिष्टी ॥२४६॥
शुभ-अशुभ समप्रमाणात । अर्जुना जेथे राहतात । ते मनुष्यत्वच असतं । फळ मिश्र ॥२४७॥
इच्छा जयाच्या मनात । तो अडके त्रिविध फळात । तया जन्म असे मिळत । इच्छेकारणे ॥२४८॥
रुचकर लागले म्हणून । जर अति केले जेवण । मग तया ते मरण । निश्चित की ॥२४९॥
अरण्य ते नसता । बरी संवचोराची मैत्रता । पण अरण्य ते लागता । घात होई ॥२५०॥
तैसे आसक्तीने कर्म करता । भासते समाधानाची कथा । पण मरण ते येता । दु:ख होई ॥२५१॥
सावकाराकडून कर्ज घेणे । मग पडेच ते फेडणे । तैसे अनिवार्य कर्माचे रहाटणे । आसक्ती असता ॥२५२॥
कणसातून प्रकटते धान्य । धान्यातून कणसाचे प्रकटन । तैसे भवचक्री होते भ्रमण । आसक्ती कारणे ॥२५३॥
जैसे कार्य आणि कारण । एकमेकांसी देती जन्म । तैसे आसक्तीने कर्म करणं । भवचक्र आहे ॥२५४॥
मनी आसक्ती असणे । अर्जुना अनिवार्य मग जन्मणे । म्हणून निष्काम कर्म करणे । सूत्र आहे ॥२५५॥
साध्य आणि साधन । ते भवचक्रच वाढवणं । आपल्याच आसक्तीकारण । भवचक्र आहे ॥२५६॥
अर्जुना साध्य साधनप्रकारे । फळभोग तो पसरे । ऐसे गोवले जाती संसारे । अत्यागी जे ॥२५७॥
जैसे फुलाचे जे फुलणे । तेच तयाचे सुकणे । अर्जुना तैसे कर्म घडणे । रहस्य आहे ॥२५८॥
बीजाचाच नाश होता । नुरते वृक्षाची ती कथा । तैसे निष्काम कर्म करता । संपते कर्म ॥२५९॥
असता शुद्ध सात्त्विक मन । भेटता गुरुकृपामृत वचन । द्वैताचे ते दैन्य । संपून जाई ॥२६०॥
द्वैताच्या त्या कारण । जे त्रिविध फल प्रकटन । ते जात असे निरसून । बोध होता ॥२६१॥
मनी बोध प्रकटता । संपते ती द्वैतता । मग विश्वाभासाची कथा । संपून जाई ॥२६२॥
कर्म संपूर्ण विरता । अनुभवा येते ब्रह्ममयता । मग ब्रह्म आणि विश्वता । भिन्न नाही ॥२६३॥
जैसे भिंत ती पडता । उरे मातीचीच सत्ता । वा पहाट ती होता । अंधार नाही ॥२६४॥
संपता ती द्वैतता । कैसी मीपणाची वार्ता । आरसा तो नसता । प्रतिबिंब कैसे ॥२६५॥
झोप ती मोडता । संपते स्वप्नाची सत्ता । तैसे विश्वाची वार्ता । संपून जाई ॥२६६॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आत्मबोधाच्या कारण । थांबते नवीन कर्म बनणं । आणि मग कर्माचं रहाटणं । खुंटून जाई ॥२६७॥
अज्ञानाच्या बा कारण । द्वैताचं ते भासणं । द्वैताचं ते रहाटणं । अज्ञान आहे ॥२६८॥
त्या अज्ञानाच्या कारण । आत्मा कर्म भिन्न वाटणं । जशी पूर्व पश्चिम वाटणं । भिन्न अर्जुना ॥२६९॥
जसं आकाश आणि आभाळ । सूर्य आणि मृगजळ । वायू आणि भूतळ । भासतसे भिन्न ॥२७०॥
जसे नदीतील ते उदक । आणि उदकाखालचा खडक । त्या दोहोंची वेगळीक । वाटते जैसी ॥२७१॥
शेवाळ आणि पाण्यात । दीप आणि काजळीत । जसा फरक असे वाटत । तैसे अर्जुना ॥२७२॥
जैसे चंद्र आणि त्या डागात । फरक असे बा वाटत । वा दृष्टी आणि डोळ्यात । भिन्नता जैसी ॥२७३॥
वाट आणि वाटसरूत । नदी आणि काठात । द्रष्टा आणि दृश्यात । फरक जैसा ॥२७४॥
हे सर्व जे वाटणे । ते द्वैताच्या कारणे । आत्मा कर्म भिन्न भासणे । द्वैत की ॥२७५॥
सूर्याकारणे कमळाचे विकसणे । नि भुंग्याने रस सेवणे । हे घडे जैसे कार्यकारणे । तैसे अर्जुना ॥२७६॥
अस्तित्वाचे हे प्रकटन । अर्जुना पाच कारणाकारण । त्या पाचांनाही जाणणं । ज्ञान आहे ॥२७७॥
या पाच त्या कारणा । जाणून घे तू अर्जुना । जयाची शास्त्रे करती घोषणा । उभारुनी बाहू ॥२७८॥
वेदांची जी राजधानी । सांख्य वेदांताच्या भवनी । या रहस्याचा ध्वनी । गर्जतो आहे ॥२७९॥
अस्तित्वाचे ते प्रकटन । कार्यकारणा कारण । त्यासाठी आत्मतत्त्वा दोष देणं । योग्य नाही ॥२८०॥
त्या सांख्यमताच्या डांगोऱ्यानं । दुमदुमलं आहे अध्यात्मज्ञान । अर्जुना ते कार्यकारण । जाणावेस तू ॥२८१॥
ते ज्ञान ऐकावे दुसऱ्याकडून । नाही बा ते घडणं । अर्जुना मी तुझे चिद्रत्न । असता येथे ॥२८२॥
हाती असता दर्पण । न लागे दुसऱ्यास विचारणं । मी कसा दिसतो म्हणून । अर्जुना माझ्या ॥२८३॥
भक्त जिकडे बा पाहे । तेथे अर्जुना मीच आहे । तो आज मी जाहलो आहे । अंकित तुझा ॥२८४॥
ऐसे प्रेमाच्या कारण । बोलता झाला भगवान । आणि इकडे तर अर्जुन । विरघळून गेला ॥२८५॥
होता वर्षाव चांदण्याचा अपार । विरघळे सोमकांत डोंगर । आणि तयाचे व्हावे सरोवर । झाले तैसे ॥२८६॥
तैसे सुख आणि अनुभूती । होऊन दोहोंची प्राप्ती । झाली अर्जुनाची स्थिती । सुखचि जैसे ॥२८७॥
तेथे समर्थ होता भगवान । तयाने सजग ते होऊन । वाचवला तो अर्जुन । प्रेमाकारणे ॥२८८॥
अर्जुन इतका बलवान । तोही जात होता बुडून । म्हणून तयासी धावून । वाचवले देवे ॥२८९॥
देवो म्हणे पार्था । तू स्वत:सच देख सर्वथा । ते ऐकून अर्जुनाने माथा । तुकविला तेथे ॥२९०॥
म्हणे अवतार तू ईश्वरी । आणि आहेस माझा कैवारी । घ्यावे मला तू एकहारी । भगवंता माझ्या ॥२९१॥
देवा मी शरणागत । तुला कीव का नाही येत । का नाही बा घालवत । जीवभाव माझा ॥२९२॥
तेथे म्हणाले भगवान । तुला नाही समजले अजून । चंद्र आणि चांदण्या भिन्न । असती का कधी ॥२९३॥
तुझ्यावरील प्रेमाकारण । मला भीती ती वाटणं । तुझं माझं एकरूप होणं । नावडे मजला ॥२९४॥
जोपर्यंत आपण भिन्न । तोपर्यंतच गोड ते जगणं । म्हणून एकरूपतेचं बोलणं । थांबवतो येथे ॥२९५॥
काय होतो मी सांगत । ते आत्मा कर्माचे भिन्नत्व । आहे का तुला समजत । अर्जुना काही ॥२९६॥
अर्जुन म्हणाला बरं झालं । देवा माझ्या मनातलं ओळखलं । मार्गदर्शन कर्मावर सखोल । द्यावे देवा ॥२९७॥
सकळ कर्माचे बीज । सांगेन कारणपंचक तुज । अशी नव्हती का पैज । घेतली तुम्ही ॥२९८॥
आणि आत्मयाचा काही । सर्वथा संबंध नाही । हे तुझे वचन सकलही । सांगावे उघडून ॥२९९॥
ऐकून अर्जुनाचे वचन । संतोषला तो भगवान । म्हणे तुझ्यासारखा श्रोता मिळणं । भाग्य की ॥३००॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जे केले तुला कबूल। तेच आता मी सांगेल। ऋणिया मी होईल। प्रेमाचा तुझ्या ॥३०१॥
मग म्हणाला अर्जुन। विसरला का भगवान। तू राखले बा मी-तूपण। प्रेमासाठी ॥३०२॥
तेव्हा म्हणाला श्रीकृष्ण। अर्जुन देई अवधान। कर्म सिद्धांत कथन। होईल आता ॥३०३॥
हे सत्यचि गा धनुर्धरा। सर्व कर्माचा उभारा। होतसे बाहेर बाहिरा। पाचाकारणे ॥३०४॥
या पाचांच्या कारण। कर्म आकाराला येणं। ते पाच हेतूकारण। उघड आहे ॥३०५॥
ते आत्मतत्त्व उदासीन। ते ना हेतू ना उपादान। ना ते अंगे करी संवाहन। कर्म सिद्धीचे ॥३०६॥
तेथे शुभाशुभ ऐशी। प्रकटती कर्मे आपैशी। जैसे रात्रदिवस आकाशी। असती अर्जुना ॥३०७॥
जल तेज वायुकारण। आकाशी अभ्राचं प्रकटन। परी अलिप्त ते असणं। आकाश जैसे ॥३०८॥
जसं नावाड्याकारण। पाण्यात नावेचं चालणं। पण पाण्याने साक्षी होऊन। राहणे तटस्थ ॥३०९॥
अर्जुना त्या मातीपासून। कुंभाराने मडकं बनवणं। पण काहीच नसे म्हणणं। मातीच जसं ॥३१०॥
मडकं कर्म कुंभाराचं। नाही काहीच कर्तृत्व मातीचं। तैसे कार्य ब्रह्माचं। अस्तित्व अर्जुना ॥३११॥
जसे त्या सूर्यप्रकाशात। सर्व व्यवहार घडतात। पण सूर्यास भान नसतं। तैसे अर्जुना ॥३१२॥
येथे कार्यकारणकारण। होते अस्तित्वाचे प्रकटन। कर्मच जग होऊन। प्रकटते येथे ॥३१३॥
ऐसी पाच ती कारण। सांगतो तुज विस्तारून। लक्ष ते देऊन। ऐकावे आता ॥३१४॥
मूळ कर्माच्या त्या कारणे। देहपणाचा भास होणे। ते कर्मचि बा असणे। कारण पहिले ॥३१५॥
हे मूळ कर्मचि बा अधिष्ठान। तेथे भोक्ता भोग्याचे प्रकटन। ऐसा अहंम होतो भासमान। देहाठायी ॥३१६॥
देहाचे करून अधिष्ठान। होते दश इंद्रियांचे प्रकटन। मग सुख दु:खाचं भासणं। इंद्रिया ठायी ॥३१७॥
येथे भोगावया पुरुषा। अन्य नाहीच काही आशा। म्हणून अधिष्ठान ही भाषा। देहासाठी ॥३१८॥
हे चोवीसही तत्त्वांचे। कुंटुंब घर वस्तीचे। गुंथाडे जे बंधमोक्षाचे। देहाठायी ॥३१९॥
किंबहुना अवस्थात्रया। हेचि अधिष्ठान धनंजया। म्हणून नाम अधिष्ठान या। देहासी अर्जुना ॥३२०॥
या कर्माच्या कारण। कर्त्याचा भास होणं। कर्त्याचा भास दुजे कारण। आहे बा अर्जुना ॥३२१॥
जसं पाण्याच्या डबक्यात। आकाश प्रतिबिंब रहातं। तैसे चैतन्य असतं। देहाच्या ठायी ॥३२२॥
जसा स्वप्नात तो। राजा भिकारी होऊन राहतं। तैसाच प्रकार होतो। चैतन्या ठायी ॥३२३॥
चैतन्याने स्वत:स विसरणं। स्वत:स देह ते समजणं। आणि देह म्हणून वावरणं। घडे तेथे ॥३२४॥
ऐसे स्वस्वरूपास विसरून। स्वत:स देह मानणं। तेच जीव म्हणून। प्रसिद्ध अर्जुना ॥३२५॥
प्रकृतीकारणे घडती कर्म। ती मीच केल्याचा होणे भ्रम। या कर्तेपणासी नाम। जीव अर्जुना ॥३२६॥
या भ्रमाच्या कारण। घडे स्वत:स पृथक मानणं। मग वाढून मी-पण। वाढतो भ्रम ॥३२७॥
जसे घराच्या खिडक्यांकारण। एकाच दिव्याचं प्रकाशणं। अनेक झाल्याचा भास होणं। तैसे अर्जुना ॥३२८॥
जैसे एकाच व्यक्तीनं। नवरस शृंगार करणं। मग नऊ प्रकार वाटणं। तैसे अर्जुना ॥३२९॥
एक असूनही ते जाणणे। विविध इंद्रियांच्या कारणे। अनेक भास ते होणे। घडे तेथे ॥३३०॥
ही इंद्रिये जी करण। जाण तेच तिसरे कारण। पृथकपणे ते दृढ होणं। तयांचे कारणे ॥३३१॥
एकचि असुनी पाणी। झालीया पूर्व पश्चिम वाहिनी। होते अनेकत्वाची भासणी। पाण्याच्या ठायी ॥३३२॥
जसा अर्जुना पवन। तेथे एकच क्रियाशक्ती असणं। पण होते अनेक प्रकारे प्रकटन। तियेचे अर्जुना ॥३३३॥
येता वाचेच्या ठिकाणी। घडे बोलण्याची करणी। आणि हाताच्या ठिकाणी। घडे देणं-घेणं ॥३३४॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

येता चरणाच्या ठायी । गतीची प्रवृत्ती होई । आणि अधोद्वारी दोही । विसर्जन अर्जुना ॥३३५॥
हृदयी नाभीकंदापासून । जो होतो ॐकार स्फुरण । तयाला अर्जुना प्राण । म्हणती सारे ॥३३६॥
मग हृदयाच्या वर । जेधवा होतो तिचा संचार । प्रसिद्ध तीच सर्वदूर । उदान म्हणून ॥३३७॥
त्या शक्तीने खाली वाहणं । तिलाच म्हणती बा अपान । आणि शरीरात राहता व्यापून । व्यान तीच ॥३३८॥
ज्याकारण अन्नरसानं । शरीरात सर्वत्र पसरणं । तो समान नावानं । प्रसिद्ध वायू ॥३३९॥
शरीरात ऊर्जेचे संचालन । सर्व सांधे नीट चालणं । ते समान वायुकारण । अर्जुना माझ्या ॥३४०॥
आणि जांभई शिंक ढेकर । ऐसा होतसे व्यापार । नाग कूर्म कृकर । नांवे त्यांची ॥३४१॥
ऐसे वायूंच्या कारण । शरीरी क्रियांचं घडणं । भिन्न भिन्न वर्तन । वायुठायी ॥३४२॥
ऐसे वृत्तींच्या कारण । भिन्न वर्तन घडणं । वायू हेच चौथे कारण । अर्जुना माझ्या ॥३४३॥
सर्व त्या ऋतूत । शरदच छान असे असत । चंद्र जसा सर्व कलेत । पौर्णिमेचा ॥३४४॥
बाग चांगली वसंतात । आणि प्रियत्तम भेटावा बागेत । मग सुख ओसंडून असे वाहत । तैसे अर्जुना ॥३४५॥
फुलात कमळ छान । त्यातही कमळाचं उमलणं । मग तेथे सुगंध पसरणं । तैसे अर्जुना ॥३४६॥
वाचे बरवे कवित्व । कवित्वी बरवे रसिकत्व । रसिकत्वी परतत्त्व । स्पर्श जैसा ॥३४७॥
तैसी सर्ववृत्ति वैभवी । बुद्धि एकलीच बरवी । बुद्धिहून शक्तिमान म्हणावी । इंद्रिये सारी ॥३४८॥
त्या इंद्रिय समूहाहून । श्रेष्ठ देवता त्या असणं । त्या देवतांच्या कारण । वर्तती इंद्रिये ॥३४९॥
या देवतांकारणे । दाही इंद्रियांचे वर्तणे । देवतांच्याच कृपेने । चालते सारे ॥३५०॥
ते देववृंद बरवे । कर्मकारण पाचवे । अर्जुना एथ जाणावे । देवो म्हणे ॥३५१॥
ती पाच मूळ कारणं । आणि तयांचे वर्णन । ऐकलंस तू विस्तारानं । आज येथे ॥३५२॥
या पाची कारणांचा विस्तार । होतो अर्जुना अपार । ते पाच हेतूंचे प्रकार । ऐकावे आता ॥३५३॥
जसं वसंताच्या कारण । नवी पालवी ती फुटणं । आणि फलपुष्पांचं प्रकटन । घडे तेथे ॥३५४॥
जसे पावसाळ्याच्या कारण । ढगांचे होते आगमन । आणि पाऊस तो पडून । पिकतसे धान्य ॥३५५॥
वा पूर्व दिशेच्या कारण । सूर्योदय तो होणं । मग सर्वत्र उजेड होणं । घडते तेथे ॥३५६॥
तसे मनाच्या कारण । होई संकल्पाचं प्रकटन । मग वाचेचे प्रकटन । अनुभवा येई ॥३५७॥
मग वाचेचा तो दिवटा । पाजळी कृत्यांच्या वाटा । मग कर्त्याचा प्रकटे ताठा । कर्तृत्वाठायी ॥३५८॥
या शारीरिक कर्माकारण । घडे पुढील शरीराचं निर्माण । जसे लोखंडी वस्तूंचे निर्माण । लोखंडाकारणे ॥३५९॥
त्या तंतूंच्या कारण । जसे होते वस्त्राचे निर्माण । तैसेच हे कार्यकारण । आहे बा अर्जुना ॥३६०॥
तैसे शरीर मनाचे कर्माकारण । होते शरीरमनाचे निर्माण । जाण हे कार्यकारण । अर्जुना माझ्या ॥३६१॥
ऐसे शरीराच्याच कारण । कैसे होई शरीराचे निर्माण । या शंकेचे निरसन । ऐकावे आता ॥३६२॥
जसे त्या सूर्याच्या कारण । प्रकाश होतो बा निर्माण । बा उसाच्या त्या कांड्यातून ।ऊस जसा ॥३६३॥
सरस्वतीचे करण्या वर्णन । जसा वाणीचाच उपयोग करणं । वा वेदाचेच करावे वर्णन । वेदाने जसे ॥३६४॥
अर्जुना शरीर मनाकारण । पुढील कर्मांचं घडणं । म्हणून शरीर मन हेतू असणं । घडे येथे ॥३६५॥
ऐसे शरीरमनाकारण । घडे कर्माचं ते रहाटणं । अर्जुना कार्य आणि कारण । भिन्न नाही ॥३६६॥
शास्त्रास त्या मानून । कर्म ते अनुसरणं । मग कर्मानेच शास्त्र बनणं । तैसे अर्जुना ॥३६७॥
जसं पावसाच्या पाण्यानं । साळीच्या शेतात बा शिरणं । मग पाण्याच्याच कारण । पिके साळ ॥३६८॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट । वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधु नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्‌गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पाडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे ह्रदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्‌गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात.  (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९९६७४८२०